# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०६/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

### धार्मिक भावना दुखाविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल

दिनांक १०/०६/२०२४ रोजी रामटेक येथील गड मंदिर परिसरातील गड मंदिर ते अंबाडा कडे जाणाऱ्या पायऱ्यांच्या डावे बाजूला असणाऱ्या जंगलामधील हजरत चांदसावली बाबा या दर्गा याची कोणीतरी अज्ञात समाजकंटकाने विटंबना केल्याने पोलीस स्टेशन रामटेक येथे धार्मिक भावना दुखावल्याबद्दल कलम २९५ व २९५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून घटनास्थळी त्वरित मा. पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रमेश बरकते, पोलीस निरीक्षक प्रशांत काळे व पोलीस स्टाफ यांनी भेट देऊन परिस्थिती पूर्ववत केली. त्यानंतर उपस्थित भाविकांनी विधिवत पूजा अर्चना केली. पोलीस अधीक्षक श्री पोद्दार यांनी लोकांशी संवाद करून शांतता राखण्याचे आवाहन केले. गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे तसेच स्थानिक पोलिसांचे पथके तयार करण्यात आलेले असून गुन्ह्याचा तपास रामटेक पोलीस करीत आहे. घटनेबाबत कोणालाही काही माहिती असल्यास उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते यांना मो क्र ७७७४९०९७७७ वरती संपर्क करावा. तसेच समाज माध्यमातून (सोशल मीडिया) घटनेबाबत कोणतेही प्रक्षोभक विधान करून अथवा अफवा पसरवून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास संबंधितावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याबाबत आवाहन केले.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**